EDI

Goadoot

December 21, 2010
Page No. 5

# 'इडीआय'तर्फे विविध अभ्यासक्रम

पणजी, दि.२० (प्रतिनिधी)

भारतीय उद्योजकता विकास संस्थेतर्फे (इडीआय) देशविदेशांत विविध क्षेत्रांत कार्य करण्यासाठी व उच्च शिक्षण घेऊन आपले भवितव्य घडवण्यासाठी निवासी स्वरूपाच्या विविध अभ्यासक्रमांची घोषणा करण्यात आली. संस्थेच्या गुजरात येथील मुख्यालयाचे संचालक डॉ. दिनेश अवस्थी यांनी आज येथे पत्रकार परिषदेत याबद्दल माहिती दिली. संस्थेचे ज्येष्ठ व्यवस्थापक निखिलेश देसाई यांचीही यावेळी उपस्थिती होती.




**इडीआयचे विविध अभ्यासक्रम व योजनांविषयी पत्रकार परिषदेत माहिती देताना संचालक डॉ. दिनेश अवस्थी. सोबत ज्येष्ठ व्यवस्थापक निखिलेश देसाई.** (छाया : सचिन आंबडोस्कर)

डॉ. अवस्थी यांनी सांगितले की, सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या विविध स्वयंसेवी संस्था व हुशार विद्यार्थ्यांसाठी संस्था १९८३ पासून देश व विदेशात अभ्यासक्रमांचे आयोजन करीत आहे. ५०० विदेशी विद्यार्थी इडीआयच्या विविध केंद्रांत प्रशिक्षण घेऊन आपले भवितव्य घडवतात. शिक्षणाबरोबरच आयडीबीआय बँकेतर्फे उद्योगासाठी कर्ज देण्याची योजना संस्थेतर्फे चालवली जात असून त्यामुळे पैशाअभावी शिक्षण फुकट गेले असे होत नाही. गोव्यात अजून शाखा नसली तरी आग्नेल कॉलेजमध्ये पर्यावरण अभ्यासक्रमाचे पदव्युत्तर शिक्षण देण्याची योजना असल्याचे ते म्हणाले. निवासी स्वरूपाच्या या केंद्रातून व्यवस्थापन, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्र व आर्थिक क्षेत्रात संधी उपलब्ध करून देणारे विविध पदव्युत्तर अभ्यासक्रम उपलब्ध असून १८ फेब्रुवारी पासून प्रवेश प्रक्रिया सुरू होत आहे. इच्छुकांनी पुढील पत्त्यावर एक हजार रुपयांच्या डिमांड ड्राफ्टसह संपर्क साधावा असे डॉ. अवस्थी यांनी आवाहन केले आहे.

पीजीपी सेक्रेटरीएट एन्टरप्रेनीअरशीप डेव्हलपमेण्ट इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया, पो. बॉ. क्र. ३२२८२८ गांधीनगर, गुजरात. दूरध्वनी क्रमांक ०७९ २३९६९१६३.